☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 285 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 22 / 07 / 2025

# 1)आत्महत्येस प्रवृत्त केले :–

**कुंडलवाडी** :–दिनांक 20.07.2025 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **मौ. अर्जापूर मयताचे घरी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील मयत नामे आनंदा हनमंतराव जाधव, वय 40 वर्षे, रा. अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड यांनी त्यांचे पत्नीचे अनैतिक संबंधामूळे व्यतित होवून स्वताला आग लावून पेटवून घेवून आत्महत्या केली. यातील आरोपी नामे 1. राजश्री आनंदा जाधव (पत्नी), 2. शंकर लिगंपा पांचाळ, रा. अर्जापूर ता. बिलोली नमुद आरोपीतांनी मयतास आत्महत्येस प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी शामराव हनमंतराव जाधव, वय 45 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 133 / 2025 कलम 108,3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री मांजरमकर, मो. नं. 7083916001** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :–

**मनाठा** :– दिनांक 21.07.2025 रोजी 11.00 वा. ते 14.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घर पळसा ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे शेतात कामासाठी गेले व वडील डयुटी साठी गेले तसेच फिर्यादीच्या आईने घराचे मुख्य दारास कडी कोंडा लावुन कुलूप लावुन उपचारासाठी बरडसेवाळा दवाखान्यात गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा कडी कोंडयाचा स्क्रु काढुन कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाटे काढुन कपाटातील ठेवलेले सोन्याचे चैन मंगळसुत्र व नगदी रूपये असा एकुण 70,000 /–रू चा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी दिलीप बापुराव थाटे, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. पळसा ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 147 / 2025 कलम 331(3), 305(अ) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2231 दाढे, मो. नं.** 9923608917 हे करीत आहेत.

# 3)मंदिरातील चोरी :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 21.07.2025 रोजी रात्री 01.10 वा. चे सुमारास, **मौ. खुपसरवाडी हनुमान मंदिर ता. जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात तीन आरोपीतांनी मोटार सायकल क्रमांक एमएच–26 / सीएस–4118 वर येवून मंदिरातील पितळी घंटा किंमती 7000 /–रू चोरून घेवुन गेले. वगैरे **फिर्यादी दत्ता व्यंकटी पातरपल्ले, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. खुपसरवाडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 696 / 2025 कलम 305(ड) बीएनएस– 2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2121 पांचाळ, मो. नं.** 9011079556 हे करीत आहेत.

# 4)मो.सा.चोरी :–

**मांडवी** :–दिनांक 20.07.2025 रोजी 03.00 वा. ते 05.00 वा.चे दरम्यान, **मौ. पोटोदा बु. रोडच्या लगत शेतातून ता किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपणीची मोटार सायकल क्रमांक एमएच–26 / डी –6386 किंमती 60,000 /– रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी संतोष माधवराव वाडगुरे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. पाटोदा बु. ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मांडवी** गुरनं 68 / 2025 कलम 303(2) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2720 अस्वले, मो.नं. 9511212420** हे करीत आहेत.

# 5)अपहरण :–

**भाग्यनगर** :– दिनांक 20.07.2025 रोजी 17.30 वा.चे सुमारास, **पावडेवाडी व डॉक्टर लॉईन कदम हॉस्पीटल नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.अनिकेत प्रकाश ढगे, 2. विकी जोंधळे, 3. चंद्रकांत लक्ष्मण मनोरवार, 4. प्रेम सुनिल कांबळे, यांनी संगनमत करून यातील फिर्यादीस पळवून नेवून शिवीगाळ करून थापड बुक्यानी मारहाण करून त्यांचेकडे कोणत्याही प्रकारचा सावकारी परवाना नसताना फिर्यादी कडून व्याजासहीत पैसे घेवून अन्यायाने कैदेत ठेवून 1,00,000 /–रूपयाची मागणी करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी बालाजी रवी सोळंके, वय 29 वर्षे, व्यवसाय ॲटोचालक रा. जुना कौठा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 422 / 2025 कलम 140(3), 115(2),352,351(2),3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / केजगीर, मो.नं. 8830763217** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :– मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी **स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रिट सेफ्टी पथक आणि शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते.** त्या अनुषंगाने दिनांक 21.07.2025 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **श्रावस्ती नगर, नांदेड येथे,** यातील आरोपी नामे शेख अझरूद्दीन उर्फ बांगा अजहर रहिमोद्दीन शेख, वय 30 वर्षे, व्यवसाय बेकार रा. श्रावस्ती नगर नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या एक गावठी रिव्हॉल्वर व दोन जिवंत काडतुस किंमती 27,000/–रू ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1542 पदमसिंह देवीदास कांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 300/2025 कलम 3/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/कदम, मो.क्रं. 8308517710** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबिशन :–

**1)उस्माननगर :–** दिनांक 21.07.2025 रोजी 17.10 वा. सुमारास, **मौ.गोविंद तांडा गोंळेगाव ते हाळदा जाणारे रोडवर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे शहाजी पुंडलिक शिंदे, वय 22 वर्षे, रा. जोमेगाव ता. लोहा हा विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी किंमत 1200/–रूपयाचा मुद्देमाल आपले ताब्यातील मोटार सायकल एमएच–26/सीएम–8827 किंमती 30,000/–रू वर चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करीत असताना मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/529 तुकाराम माधवराव जुन्ने, ने. पोस्टे उस्माननगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 160/2025 कलम 65(ई), म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2185 वडजे** मो.नं. 7550108150 हे करीत आहेत.

**2)भोकर :–** दिनांक 21.07.2025 रोजी 18.00 वा. सुमारास, **मौ.ईळेगाव पाटीजवळ सुर्या हॉटेल, ता.भोकर जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे किशन सटवाजी ईबितवार, वय 54 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मोघाळी ता.भोकर हा विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी व विदेशी दारू किंमत 2840/–रूपयाचा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/22 स्वप्नील बाबाराव रूंजकर, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 380/2025 कलम 65(ई), म.प्रो.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1017 केंद्रे,** मो.नं. 7722008444 हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड